# फूळसगरे

## मनोहर तोडणकर



म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४४९

REFBK-0023418
REFBK-0023418

# फूलझगरे

मनोहर तोडणकर

REFBK-0023418
REFBK-0023418

या कवितासंग्रहाच्या प्रकाशनार्थ अनुदान गौरव केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे आम्ही ऋणी आहोत.

[ किंमत १० रुपये ]

मनोहर तोडणकर,
कोकण सहनिवास,
४४/१७२९ वर्तकनगर,
ठाणे–४०० ६०६.

□

प्रथमावृत्ती : मार्च १९८१

□

मुखपृष्ठ : बळी लवंगारे

□

मुद्रक : प्रकाशक
श्री. शा. बा. करंगुटकर,
प्रॉस्पेक्ट प्रिंटींग प्रेस, दादर,
मुंबई–४०० ०२८.

□

प्रमुख वितरक :
केशव कोठावळे,
मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगांव, मुं. ४०० ००४.
विष्णु निवास, टिळक ब्रीजजवळ, दादर, मुं. ४०० ०२८.
शनिपाराजवळ–पुणे, नारायण गेटाजवळ, पुणे–३०.

–फक्त तुलाच

---

श्रेय :– डॉ. धनंजय कीर, श्री. अच्युत तारी, सौ. विजया वाड, प्रा. सदानंद रेगे, प्रा. रमेश तेंडुलकर, सर्वश्री केशव कोठावळे, बळी लवंगारे, राजन साटम, शामराव करंगुटकर, दामोदर नाईक, विवेक पटवर्धन, अशोक नलावडे, चंद्रकांत चव्हाण, प्रदीप कर्णिक, अरुणोदय भाटकर आणि विष्णु शं. पाटील.

# अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| फूलझगरे | १ | एक | २८ |
| जाणाराने | ३ | मन | २९ |
| मुक्ती | ४ | सकाळपासून | ३० |
| नाते | ५ | व्यथा | ३१ |
| नुस्ते नुस्ते | ६ | हुंकार | ३२ |
| जाण | ७ | मुखवटे | ३३ |
| तुझे केस | ८ | राख | ३४ |
| ओढ | १० | प्रश्न | ३५ |
| आकाशाचे दुःख | ११ | ठसे | ३६ |
| उधाणलेला पिवळा समुद्र | १२ | दगड | ३७ |
| झाड | १३ | तू प्रीतीची | ३९ |
| सुवासाचे मरण | १४ | प्रतिक | ४० |
| कवचकुंडले | १५ | चार कविता | ४१ |
| गंधवेडी | १६ | माझे डोळे | ४२ |
| झुंबर | १७ | मलूललेले | ४३ |
| नुकती नुकती | १८ | एक तू एक मी | ४४ |
| स्वप्ने | १९ | काटा | ४५ |
| चांदवा | २० | सुरंगा | ४६ |
| तू एकदा भेटल्यावर | २१ | आघात | ४७ |
| बंधन | २२ | अशी यावीस तू | ४८ |
| रेगीस्तानच्या वाळूवर | २३ | चंद्र नेत्री भारावलेला | ४९ |
| इतुके | २४ | जेव्हा तेव्हा | ५० |
| अंधार | २५ | तू गेलीस अन् | ५१ |
| तू | २६ | दान | ५२ |
| आकाश | २७ | | |

## विश यू ऑल दि बेस्ट ...

पहिला वहिला असला म्हणून काय झालं ?

कवितासंग्रहाला दुसऱ्याची प्रस्तावना कशाला हवी ?

संग्रहातील कविता याच आपल्यातील श्रेयाच्या साक्षी नसतात का ?

पण कविता करणं, त्या पुस्तकरूपानं प्रसिद्ध करणं
हा जसा भौतिक व्यवहाराचा भाग आहे, तशीच कदाचित्
हीहि एक गरजच असावी. एक उपचार.

आपलं पहिलंवहिलं पुस्तक प्रसिद्ध होतांना कवीनं थोडंसं
बुजून जाणं, इतरांना हा प्रकार कितपत भावेल याविषयीचं
कुतूहल मनात बाळगणं, आपण ज्यांना 'जाणते' समजतो
त्यांचं आपल्या कवितांविषयी मत काय आहे, हे जाणण्याची
आतुरता असणं हे अर्थातच स्वाभाविक आहे.

तोडणकरांना मी 'जाणता' वाटलो अन् म्हणूनच
'फूलझगरे' या आपल्या कवितासंग्रहासाठी दोन शब्द
लिहिण्याची त्यांनी मला विनंती केली.

मी फुशारलो नि चटकन हो म्हणून टाकलं.

ते गेले नि मी त्यांच्या कविता चाळीत बसलो.

बसलो नि जेवण वाढलेलं होतं तरीही त्या संपेपर्यंत उठलोच नाही.

उठवलंच नाही. त्यादिवशी गारपीट जेवण जेवलो याचं
भानही राहिलं नाही.

त्यांची कविता पाकळीपाकळीनं उलगडत होती
अन् त्यांच्या मखराच्या पलीकडचं फूल हळू हळू
आकाराला येत होतं...

काही माणसं जाणून बुजून कविता करण्याचा वेडेपणा का करतात ?
शेवटी हाती नरोटीच यायची आहे हे कळत असूनसुद्धा शब्दांच्या,
प्रतिमांच्या, ध्वनींच्या, एकूण भाषाप्रक्रियेच्या उगीचच वाटेला
कां जातात ?

कारण उघडच आहे.

दुसरं गत्यंतर नसतं म्हणून.

माणूस हे एक अद्भुत आहे. विचित्र रसायन आहे.

माणूस म्हणजे शरीर.

पण नुसतं शरीरच म्हणजे माणूस नव्हे. हे तर नक्कीच.

केवळ पैसे चिवडणारा, केवळ सत्तेचा सोस करणारासुद्धा तो जे
काही करतो ते केवळ शरीरासाठी करीत नाही. त्याच्याही
शरीरापलीकडे दुसरा एक माणूस असतो. त्याच्यासाठी.

हा माणूस कोण आहे, तो कसा बोलतो चालतो याचा शोध घेणं
म्हणजे जीवनाची पायपीट करणं.. जगणं.

हे जगणं ज्याला भावलं तो परमेश्वराचाच छोटा आकार असतो.
परमेश्वरासारखीच निर्मिती करणं हा त्याचा श्वासोच्छ्वास होतो.

अवकाशातून, काहीही अस्तित्वात नसतं अशा पोकळीतून
आदि स्वरांची सळसळ ऐकू येऊ लागते नि त्या सळसळींतून
शब्द–प्रतिमा–रूपकांचे नुपूर झनझनतांना कानावर पडू लागतात.

ते...तसंच...तसंच होणं अटळ असतं. व्यवहाराची नि त्याची
यत्किंचितही सांगड बसण्यासारखी नसली तरी.

आणि यालाच शहाणी माणसं नसतं वेड म्हणतात.

शहाणी माणसं–शरीरापलीकडचा माणूस न पाहूं शकणारी.

तोडणकरांच्या कवितेतला हा माणूस कसा दिसतो ?

माणसानं असावं तसा. माणसासारखा.

भंवतालच्या साऱ्या साऱ्या सौंदर्यावर मनस्वी प्रेम करणारा.

आपल्या मनाच्या डोहात या शाश्वताची प्रतिबिंबं जपणारा.

शब्दांचा आदर ठेवणारा. त्यांना अर्थांची परिमाणं देणारा.

जीवनातील आर्त जोपासणारा.

शब्दांच्या नव्हाळीतील बागडणाऱ्या मासोळ्या न्याहाळणारा.

याच्या फुलबाज्यांतून ठिणग्या उडतात त्याही फुलं होऊन.

'सामाजिक जाणीव' हे आजचं चलतं नाणं.

पण ते आपल्या साठवणीत नाही याचं भानच नसल्यामुळे

त्याबद्दल मुळीसुद्धा खंत न बाळगणारा.

तथाकथित 'सामाजिक जाणीवे'च्या आधीच पलीकडे गेलेला.

तेजाची शपथ घेणारा.

ज्याच्या स्थंडिलात मृत्यूचे सात कोंबडे आरवले आहेत असा.

दहा पोरांच्या संसारासाठी पठाणाची दारं झिजवणारा.

मिट्ट निगूढ अंधार पिणारा.

क्षण क्षण इथे व्हावे रंग अशी आळवणी करणारा.

या झाडाला सुवासाचे वेड होते
म्हणून ते फुलणार होते
हळदिव्या हाताचे ठसे
सर्वांगावर उमटवून
गर्भारलेल्या मातीला फुलवून
आकाशाला गवसणी घालण्यासाठी . .

हा एक भोरपी आहे.
हा एक दशावतारी आहे.
हा वासुदेव. हा गोंधळी. हा वाघ्या.
हा किती रूपे घेणारा.
किती अधासल्या डोळ्यांनी देखणारा.
क्वचित् हळवा.
क्वचित् मनीच्या दुःखावरून पिसे फिरवणारा.
तरीही गंधवेडी पिसाटासारखी
धावत सुटली कातरवेळी
रानफुलातून
तिला मातीचे दान देऊन
पहिल्या पावसासाठी थांबविणारा.
त्या रात्रीचा साज तुझा तो पुन्हा होऊ दे अभिनव ग
तुझी पाचुची बोटे अलगद आकाशावर उमटव ग...
अशी जीवघेणी धून आळविणारा.
किती रूपे, किती दर्शने या शरीरापलीकडच्या माणसाची !
अंगांगी भिनलेली. शरीरापलीकडल्या माणसाशी एकरूपत्व पावलेली.
पूर्वसूरींचे, समकालिनांचे परिचित, ढोबळ प्रतिध्वनी इथं खूप आहेत.
पण ते गळून पडतील
अन् आपली गाणी गात गात मांडलेल्या या प्रस्थानात
तोडणकरांना आपला स्वतःचा परीस गावेलच गावेल.
मग त्यांच्या स्वतःच्या आकाशात
त्यांचा स्वतःचा मेघ येईल
अन् त्याच्या दर्शनानं ते स्वतःच थुईथुई नाचतील...
विश यू ऑल दि बेस्ट !

सदानंद रेगे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७७१
दा. क्र. २३७१८
काव्य १६५४८
ग्रंथ० शाखा (स्थळ प्रत)

## ॥ फूलझगरे ॥

सूर्याने अपुले अंगोस्तर फेकले
नि फूलझगरे धरतीवर पडले...
निळे जांभळे पिवळे केशरी हिरवे राखी
फूलझगरे जाळीत होते काळीज
मातीतून उमलणाऱ्या झऱ्याचेही त्यांना भान नव्हते
पिसाट वाऱ्याचीही त्यांना खंत नव्हती

मन असते तर त्यांनी काळीज जाळले नसते
त्यांना ठाऊक आहे फक्त जळायचे
चैत्रापासून फाल्गुनापर्यंत ऋतुचक्रातून चालायचे
फुंकर घालाल काय त्यांच्यावर डोळ्यांचे करून शिंपले :

सूर्याने अपुले अंगोस्तर फेकले
नि फूलझगरे धरतीवर पडले...

माझ्याही मनात असेच फूलझगरे आहेत
पण त्यांचा रंग मला माहीत नाही
क्रूर वासनेचे स्वार्थी फूलझगरे
आग ओकीत असतात दिवसारात्री
म्हणून त्यांना बांध घालता येत नाही
कारण आग ओकायचीच त्यांना संवय आहे
आता शाप माथी घेऊन तारुण्य मात्र गेले :

सूर्याने अपुले अंगोस्तर फेकले
नि फूलझगरे धरतीवर पडले...

मला वाटत होते मी कर्णासारखा होईन
सूर्यपुत्र म्हणून दिमाखाने जगण्यासाठी
त्या कर्णाने सूर्याला अर्घ्य तरी दिले होते,
मी मात्र आयुष्यात वासनेची पूर्ती साधली
केवळ माणसाच्या प्रवृत्तीची,
सुसंस्कृत असूनही पठाणाची दारे झिजवली
दहा पोरांच्या संसारासाठी
शेवटी तेजाची शपथ घेऊन सांगतो
माझ्या स्थंडिलात माझ्या मृत्यूचे सात कोंवडे आरवले :

सूर्याने अपुले अंगोस्तर फेकले
नि फूलझगरे धरतीवर पडले...

## ॥ जाणाराने ॥

जाणाराने जायचे असते
निळसर डोळस तंद्रीला हुलकावून
अल्याड पल्याड क्षितिजाचे माप घेऊन ..

जाणाराने जायचे असते
लाल जर्द जास्वंद अंगी लेऊन
दिशा दिशांची लाली उधळून...

जाणाराने जायचे असते
उभरती पिवळी किरणे उधळून
सूर्यालाही क्षणी तिथेच थांबवून...

जाणाराने जायचे असते
मावळती केशर काडी ओढून
मिट्ट निगूढ अंधार पिवून...

## ॥ मुक्ती ॥

कुणाला काय अन् कसले दुःख
देवाजवळ मागतो कुणी सुख...

कुणाचे काय कसले जन्मांतरीचे नाते
कोण कुणी मात्र नैराश्यातच हसते...

कुणाला काय कसले भोग आणि पाप
कुणी शेवटी एकदा करतो मनस्ताप...

कुणाला काय कसली आठवते भक्ती
इतुके झाले तरीही मातीतच मिळते मुक्ती...

# ॥ नाते ॥

दूर कुठे क्षितिजाच्या पोटी
संध्याछाया झुकते आहे
अन् पाण्याच्या लाटेवरती
छटा मुलायम लपते आहे...

उभ्या आडव्या रेषांमधले
अंतर मोजीत डोंगर आहे
हळूच त्यातून घेऊन गिरकी
पक्षी गाणे गातच आहे...

चंचल रेशमी भावूक वाळू
झिळमिळ करूनी बसली आहे
कातरवेळी स्पर्शीत गंधीत
वायु चराचर व्यापीत आहे...

अन् आकाशीं अवचित येऊन
एक चांदणी फुलली आहे
बघुनी तिजला उंच माड हा
नाते अपुले जडवित आहे...

# ॥ नुस्ते नुस्ते ॥

नुस्ते नुस्ते आभाळ येई चांदणे भरून
नुस्ता नुस्ता रस्ता जाई वळणे घेऊन
नुस्ते नुस्ते झाकोळले दिव्याखाली घर
नुस्ता पडे बाहेर घट्ट पिळदार धूर !...

नुस्ती नदी वाकडी तुडुंबच भरलेली
नुस्ती कृष्णछाया ही काठावर दाटलेली
नुस्त्या नुस्त्या पानात मंद मंद हालचाल
नुस्ते हवे होते वाटे अंग अंग श्यामल...

नुस्ते ओले ओले केस नुस्ते ऊर अधीर
नुस्ती चोळी सुटलेली नुस्ता ढळे पदर
नुस्त्या या स्वप्नाचे नुस्ते दाटे निळे जाळे
नुस्त्या आठवणी आणि नुस्ते डोळे भिजलेले...

## ॥ जाण ॥

मन शृंगारू दे पहिल्या भेटीत
ओढ अनावर होऊ दे प्रीतीत...

चंद्र वेडापिसा असू दे या रात्री
काळोखाची पिसे शहारू दे गात्री...

डोळ्यांच्या रेषांना येऊ दे ग धुंद
क्षण क्षण इथे व्हावे रंग रंग...

तुझे गूढ स्वप्न भिजू दे दंवात
चांदण्यांची माळ पडू दे गळ्यात...

कळू दे तुझिया अस्तित्त्वाची जाण
मत्त मिठी दिठी हरपू दे भान...

## ॥ तुझे केस ॥

तुझे काळेभोर केस मोकळे असतात
वाऱ्याच्या हळूवार नादात
तेव्हा ते सुगंधाची कुपी घेऊन येतात माझ्या मनात...

उषःकालची चाहूल लागते अन् क्षणभर जाग येते
तेव्हा त्या सुंदर केसांचा भार मोकळा होतो :
जसा कड्यावरून कोसळणाऱ्या धबधब्यासारखा...

तुझे काळेभोर केस मोकळे असतात
कंकणाच्या मधुर नादात, तुझ्या त्या केसात
नाजूक बोटांची हालचाल होत असते :
जशा आकाशात असंख्य चांदण्या फुलाव्यात..

तुझे काळे भोर केस, ते मऊसूद केस
सोनेरी परींचे वाटतात,
जेव्हा तुला न्हावू घातले असते कोवळ्या किरणानी
अन् तुझ्या त्या स्वप्नमयी हाताचे ठसे
त्या केसावर उमटलेले दिसतात :
मोरपिसासारखे...

सूर्य माथ्यावर येतो तरी तुझे ते केस,
काळे भोर केस मोकळेच असतात आपला गर्भगंध पसरवून
जेव्हा तू मान वळवून बघतेस
तेव्हासुद्धा ते केस लाजवंती दिसतात :
एखाद्या नववधुसारखे...

माझ्या स्वप्नाळू डोळ्यात
तुला काही तरी शोधायचे असते
पण तू अबोल होतेस
तुझ्या थरथरत्या ओठावर शब्द येतात
अन् झटकन तू माघारी फिरतेस
तेव्हा तुझे केस :
बाजीरावाच्या मस्तानीसारखे दिसतात...

सूर्य ढळताना सांज कलताना तुझ्या त्या धुंद केसात
मोगऱ्याचा गजरा माळलेला असतो
त्या गजऱ्यातील एखादेतरी फूल गळावे
अन् त्या फुलाने तू दिवसभर सोडलेल्या
तुझ्या मोकळ्या केसाचे रहस्य
मला रात्रभर सांगावे...

# ॥ ओढ ॥

मंथर लहर पानात असावी
दाटल्या गंधात जरा तू झुकावी...

मोगरी फुलांचा सुवास सुटावा
मनाचा गाभारा गहिरा असावा...

प्रीतीची झालर आकाशी कोरावी
स्वप्नाळू सुवर्णा प्राचीत विरावी..

नभाच्या प्रांगणी रंजिता सरावी
सुरेल किनार मेघानी कोरावी...

फेनील लाटांचा निनाद घुमावा
दिशांच्या कुशीत पारवा फिरावा...

लकेर क्षणाची अंगात भरावी
ओढ आवेगात मिठीत बसावी...

# ॥ आकाशाचे दुःख ॥

आकाशाने कोरले दुःख क्षितिजावर
उत्तर रात्रीच्या गूढ धुक्यात
विस्कटल्या होत्या पाऊलवाटा
विझले होते झिळमिळणारे दिवे
सांजवतींची शपथ घेऊन...

जागत्या पहाऱ्यावर उभा होता
कोणी एक अस्मादिक,
अवकाशात स्वतःची पोकळी निर्माण करून
आकाशाला मुठीत घेऊ पहात होता
अपुल्या दुबळ्या शक्तीने...

आकाशाला दुःख होते सनातन आत्म्याचे
ज्याने सगळे विस्कटले होते एका रात्री
एकारात्री काळोखाची पिसे रक्तरंजित
झाली पिसाटासारखी
उत्तर रात्रीच्या गूढ धुक्यात घडलेल्या
पापाच्या खुणा पाऊलवाटेवर उमटवीत
आकाशाच्या दुःखावर फुंकर घालीत...

## ॥ उधाणलेला पिवळा समुद्र ॥

उधाणलेला पिवळा समुद्र कोरतो
शिंपल्यावर रेखीव नक्षी
साचलेल्या शेवाळीखालची वेदना
दूर करण्यासाठी
स्वतःच गोंदून घेतो आपुल्या वक्षी...

पिवळा समुद्र उन्हात तापतो
तेव्हां त्याच्या रागाला पारा नसतो
थंडपणे सोसलेल्या दुःखाची
बेभानपणे तो गाथा सांगत असतो...

गर्भार मातेच्या बालकाला मातेच्या
वेदना माहीत नसतात तसेच
शिंपल्यातील मोत्यांना शिंपल्याचे
दुःख माहीत नसते...

पिवळा समुद्र मात्र सगळेच अपराध
पोटात घेतो
त्याच्या दुःखाची कणव फक्त
त्या सूर्याला असते कारण
त्यानेच जन्म दिलेला असतो त्या समुद्राला...

उधाणलेला पिवळा समुद्र
दुःखाचे ओझे घेऊन थकला आहे
सूर्य मात्र क्षितिजावर
हळवा होऊन बसला आहे...

## ॥ झाड ॥

कालच्या वादळात हे झाड कोलमडले
कालच ते बांधणार होते
निवाऱ्यासाठी एक घर
आपल्याच फांदीच्या ढोलीतील
पक्ष्यांच्या घरासारखे

आपल्याच पानांच्या असंख्य छिद्रातून
बघणार होते भविष्याची स्वप्ने
बघणार होते आकाशातील चांदण्या
पौर्णिमेचा चंद्र अन् त्याला उभ्या
उन्हात शिक्षा देणारा सूर्य...

कालच्या वादळात हे झाड कोलमडले
त्याच्या पिळदार खोडाचा गाभा थरथरला
अंधारातून प्रकाशाकडे जाणाऱ्या अनेक कसदार
फांद्याही शहारल्या...हळहळल्या...

ह्या झाडाला सुवासाचे वेड होते
म्हणून ते फुलणार होते
हळदिच्या हाताचे ठसे
सर्वांगावर उमटवून
गर्भारलेल्या मातीला फुलवून
आकाशाला गवसणी घालण्यासाठी
पण कालच्या वादळात हे झाड कोलमडले...

# ॥ सुवासाचे मरण ॥

मरण सर्वांनाच असते
पिचलेल्या देहात वेदना सोसताना
आकाशाच्या ठिणग्या मोजाव्या लागतात
पापपुण्याच्या आवर्तनातून सगळेच
समुद्राला मिळतात

मरण सर्वांनाच असते,
तुम्हांला, आम्हांला, प्राण्यांना, झाडा-फुलांना
सर्वांना
पण मरणाच्या तऱ्हा बाभळीच्या काट्यासारख्या
बोचतात तेव्हा प्रत्येकाचा रंग कळतो
मरणाच्या सरणावर कात टाकलेल्या
सापासारखा कोणी कधी दिसत नाही
वसंतात गाणाऱ्या कोकिळेसारखा
कधीं कुणी गात नाही—

तर तो साला सुवासच होऊन रहातो
फुलांतील सुवास
वाऱ्याच्या कुशीत लपण्यासाठी
जगातील खोट्या मुखवट्याची भाषा ऐकण्यासाठी
काळ्या रात्री उघड्या देहाचे शाप घेण्यासाठी

मरण सर्वांनाच असते
म्हणून पापाचे पीतर माझ्या माथी फोडून
साल्याला सुवासाचे मरण येते
मी मात्र त्या राखेकडे पहात रहातो
मला ठाऊक असते
माझीपण तीच जागा असते

मरण सर्वांनाच असते
पण साल्याला सुवासाचे मरण येते...

## ॥ कवचकुंडले ॥

मावळतीची सांज पिवून
सूर्याने दिलेली समुद्राच्या साक्षीने
काळोखाची कवचकुंडले घातली आकाशाने...

मृत्युंजयाची नशा घेऊन आकाश
धरणीला कवेत घेण्यासाठी ओठंगून
राहिले गच्च काळोखात...

मरणाची खंत नव्हती तरी मरणासाठी
झेपावलेले आकाश
चांदण्या फुलवू लागले...

उत्तर रात्री
शरीर बुडाल्यावर अख्या स्वप्नातच त्याने
कवचकुंडले सोडली त्या समुद्रात
आणि उगवतीच्या सूर्याला
साक्षी ठेवून ते हंसले
लाल मातीचे लेणे घेऊन
समुद्रालाच साक्षी ठेवून...

## ॥ गंधवेडी ॥

गंधवेडी पिसाटासारखी
धावत सुटली कातरवेळी
रानफुलातून...

गंधवेडी थरथरली क्षणभर
झाडांच्या हळव्या सावल्या बघून
साठलेल्या सुवासहीन
पाचोळ्याला गोंजारून
चक्री वादळासारखी घुटमळली

गंधवेडी त्या पाचोळ्यात
पूर्वजन्मीचा तिचा आत्मा
आपली प्रेमगाथा सांगत होता
म्हणून कदाचित भिरभिरली...

शेवटी गंधवेडी थांबली त्या अंधारात
रानफुलांच्या स्पर्शाने
तिच्या स्वप्नांची दारे उघडली
आकाशात चांदण्यासाठी

चांदण्यानीही गंधवेडीला भुलविले
आणि मातीचे दान देऊन
थांबविले पहिल्या पावसासाठी...

## ॥ झुंबर ॥

भिजले केस तुझे सखे धवल चांदण्यात
धुंद गंध हा दरवळे माझ्या स्वप्नील मनात

भासतेस कधी तू स्वर्गातली ग अप्सरा
लावण्य गोरटे तुझे मज भुलविते क्षणात

डोळ्यातली गूढ ती कळली मौन भाषा
अमृताची गोडी तुझ्या साठली ओठात

सरली रात्र प्रिये पिऊनी कैफ यौवनाचा
आनंदाचे झुंबर फुलले अपुल्या मीलनात

## ॥ नुकती नुकती ॥

नुकतीं नुकती ओळख व्हावी
पुन्हा नव्याने अवचित अपुली
आणिक भंवती फिरून यावी
असंख्य वलयें स्वप्नामधली...

नुकती नुकती आज फुटावी
चैत्रामधली पिंपळ पाने
धुसर धुक्यातील गूढ उकलुनी
धुंद वायुने गावे गाणे...

नुकती नुकती तुझ्या असावी
अजुनी ओठी मिस्कील वाणी
श्वास सुगंधीत केस मोकळे
स्पर्श असावा मिटल्या नयनी...

नुकती नुकती अजून असावी
निळवंतीच्या फुलल्या रात्री
त्या माळावर नवल घडावे
लयी जिराव्या नवथर गात्री...

नुकती नुकती पहाट व्हावी
आणि दिसावी तूच आगळी
फिरुनी मजला भेट एकदा
पुन्हा नव्याने अवचित अपुली...

## ॥ स्वप्ने ॥

किती स्वप्ने ओंजळीत घेतलीस
आणि किती त्यातली जपून ठेवलीस
किती जणाना मुजरे करताना
किती घुंगरू तुटले याचा हिशेब
तू केला नाहीस

किती वाटा चुकल्या तुझ्या दारांच्या
जेव्हा तू अंधारातच कुस्करून ठेवलेल्या
तुझ्या देहाला विश्रांती देत असताना...

स्वप्ने खरी नसतात याचा संभ्रम पडला होता
तुझ्या दारावरून दुसऱ्या दाराकडे जाताना
शांततेत किती वेदना सहन केल्यास
तुझ्या पायातील घुंगरासारख्या

मनाला एकच प्रश्न विचारीत तू
झोपलेल्या मनाला जागे केलेस
उद्याच्या किरणात कोणता रंग भरणार आहेस
हे विचारण्यासाठी

अन् मी अंधारातच तुला शोधीत आहे
ओंजळीतल्या स्वप्नांना जवळ घेऊन
त्यांतली कितीतरी स्वप्ने विस्कटून...

## ॥ चांदवा ॥

उसासणाऱ्या धुपात
परिमळणारी याद
रसावलेल्या गात्रात
हिंदोळणारा उन्माद...

धुंद धुंद वलयात
ओल्या हळदीचा साज
लाजवंतीच्या पानी
ये शहारूनी लाज...

झंकारलेल्या नादात
कापुरी धुके दाट
स्वप्नाळू डोळ्यापुढे
मळवटलेली वाट...

मोह फुलांचे तुरे
तुझ्या मेंदी भरल्या करी
गंधगर्भ चांदवा
साठवलेला उरी...

# ॥ तू एकदा भेटल्यावर ॥

तू एकदा भेटल्यावर
साऱ्या स्वप्नांना फुलवीन सूर्य किरणात
आणि चांदण्यात झाडाचे गाणे
ऐकवीन तुला चैत्रातील भेटींचे

गाणे जे बंधनाच्या पलीकडचे
शोधीत होते क्षितिजावरचे कोडे
तू म्हणालीस : बहरलेला प्राजक्त
माझ्या उरी कोसळेल काय ?
कोसळल्याने त्याच्या भाराने
मी स्वतःला विसरेन काय ?

उत्तर रात्रीच्या गूढ धुक्यात रतीमदनाची
धुंदी मावळल्यावर तू
स्वप्नासारखी निघून गेलीस

तू एकदा भेटल्यावर
त्या जाण्याचे कारण मी विचारीन
त्या झाडाची गाणी मी गाईन
त्या धुक्यात मी तुझ्या अस्तित्वाला
साक्षी ठेवून तुझ्या वाटेवर
प्राजक्ताची फुले उधळीन

तू एकदा भेटल्यावर
मीच माझ्या शब्दांना कवच देईन कवितेचे
आणि तुला बसवीन त्यात
पौर्णिमेच्या चंद्रासारखे...

## ॥ बंधन ॥

हे सागराचे धुंद किनारे किनारे
धूसर धुक्याचे धुवारे धुवारे

रांगा डोंगरांच्या वाकड्या वाकड्या
नागमोडी वेलींच्या फुगड्या फुगड्या

गर्द झाडांच्या गार सावल्या सावल्या
ओघळती फुलांच्या पाकळ्या पाकळ्या

धबधब्यांचे शुभ्र फवारे फवारे
अंगभर येती क्षणी शहारे शहारे

स्वप्नवती तू पाण्याच्या डोहात डोहात
बंधन होऊ दे अपुले या भेटीत भेटीत...

## ॥ रेगीस्तानच्या वाळूवर ॥

रेगीस्तानच्या वाळूवर तुला पाहिले
काळ्यातून जाताना
तू सजलेली रंगीबेरंगी
नटखट नजरेची कुणी एक सुंदरी होतीस

तुझ्या गोऱ्या हातावर गोंदलेल्या
खुणा मला कुठेतरी
पूर्वजन्मीच्या आठवणीत नेत होत्या
तुझ्या रेशमी बंधनात साठवलेली
कितीतरी स्वप्ने त्या वाळूत दिसत होती

तू पुढे पुढे जात होतीस
मी मात्र ओझे घेऊन अन्यायाचे
तुझ्या पाऊल खुणावर पावले टाकीत
जात होतो स्वःतालाच विसरून
त्या रेगीस्तानच्या वाळूवर...

## ॥ इतुके ॥

इतुके इतुके धुक्यात बुडले नभ निळे
इतुक्या इतुक्या पानोपानी संथ दंव गळे...

इतुका इतुका धुंद उरी रंग निळा निळा
इतुका हा अधीर पानवला डोळा निळा...

मेंदीभरल्या हातामध्ये इतुका हा हिरवा चुडा
आठवतो पहिल्या रात्री रंगलेला लाल विडा...

इतुक्या या उत्तररात्री मन निळे बिंबलेले
इतुकी हवी ओलीचिंब हवे कुंतल मोकळे...

इतुक्या इतुक्या निळाईत लाल लाल कडा
इतुके झाले तरीही जाई मनी खोल तडा...

## ॥ अंधार ॥

प्रकाशातून अंधाराकडे जाताना
अंधारातून प्रकाशाकडे येताना
मन एकच असते तुझे माझे

पण चंद्राची प्रकाशाची बाजू तुझीच
आणि त्याच चंद्राची जी न दिसणारी
अप्रकाशित ती माझी

बावचळलीस ?

प्रकाशाच्या चंद्रावर डाग असूनसुद्धा
तो तुझ्यासारखा सुंदर आहे
आणि अंधाराच्या चंद्रावर मी मात्र
त्याच्यासारखाच अंधार आहे···

## ॥ तू ॥

प्राजक्ताची फुले वेंचताना
प्राजक्तच होऊन गेली होतीस

केशरी सुगंध घेताना
केशरच होऊन गेली होतीस

गुलाबाचे फूल माळताना
गुलाबच झाली होतीस

चांदण्यात फिरताना
चांदणेच झाली होतीस

हे सगळे झाल्यावर :

माझ्याकडे येताना
हृदयच विसरून गेली होतीस...

## ॥ आकाश ॥

आकाशाने दाखवली मला
त्याची धुंद निळाई—
मनीं एक तडा जाई...

आकाशाने दाखवले मला
खोल क्षितिज रंगलेले—
स्वप्न जिथे भंगलेले...

आकाशाने घडविले जे
अथांग अस्तित्त्व अपुले—
चंद्र-सूर्य विस्कटलेले...

आकाशाने फुलविले
झिळमिळणारे चांदणे—
ओठावरले अधुरे गाणे...

आकाशाने दाखवली दिशांची
वाट भंवती वेढणारी—
काळजांत सलणारी...

## ॥ एक ॥

एक छंद
एक धुंद
किती जागल्या राती--

एक चंद्र
एक सूर्य
दूर राहिली नुसती माती—

एक पतंग
एक फूल
रानावनात जाई भूल—

एक शब्द
दोन श्वास
मनी मात्र नुसता आभास—

## ॥ मन ॥

पौर्णिमेच्या रात्री
आभाळ उलटे सुलटे करीन
आणि तुझ्या डोळ्यात स्वप्न पाहीन
चांदण्यांचे

उधाणलेल्या समुद्राला ओंजळीत घेईन
शोधण्यासाठी त्याच्या तळातले
शिंपले जे तुझे माझे होते

पौर्णिमेच्या रात्री
तुला माझ्यापासून दूर नेणाऱ्या
नियतीला विचारीन :

आभाळ आणि समुद्राच्या पलीकडे
असणाऱ्या पृथ्वीवरच्या
माणसाला मन असते
हे तुला ठाऊक आहे काय ?

आता चांदण्या उगवणार नाहीत...
समुद्रात शिंपले दिसणार नाहीत...

## ॥ सकाळपासून ॥

सकाळपासून सकाळपासून
मन बसलंय् इंद्रधनु होऊन
तुझं माझं नातं जोडून
स्वप्नाचं जाळं उरी घेऊन...

सकाळपासून सकाळपासून
मन बसलंय् डोळे मिटून
ध्यानमग्न मंत्र जपून
शरदाची रात्र कवटाळून...

सकाळपासून सकाळपासून
आठवणींची एकच धून
रंगामध्ये रंग बुडवून
केली होतीस ओठावर खूण !...

## ॥ व्यथा ॥

थांब ! जागृतीची वेदना
नुकतीच आली आहे
त्या आत्म्याला त्या आत्म्याला
स्पर्श होऊ दे जीवनाचा...

थांब ! सूर्याची किरणे
व्यापून टाकू दे धरणीला
गूढ प्रगूढतेत असू दे
तुझी व्याकुळलेली भावना...

थांब ! आताच का नको
बेरीज वजाबाकी जीवनाची
आताच होऊ दे सारे
व्यथा कशाला भविष्याची ?...

## ॥ हुंकार ॥

तू थांबलीस वळणावर तुझ्या भोवतीं साकळलेल्या
गडद अंधाराला मुडपून घेण्यासाठी
ती वाट ओळखीची
काळ्याशार दगडावर तिथे एक गोंदलेला शब्दाचा हुंकार !...

तो हुंकार टिपून घेतलास पुन्हा एकदा नव्याने...
केशर भिजली थरथरती सांज
मनात घुटमळून घेण्यासाठी थांबलीस तू जेव्हा—
कोवळ्या गवतावर लिपकत
असता मावळतीचे पाश
फांदोऱ्यातून घुसमटत येणारा आळूमाळू वारा
नि ढगांचे जांभळे लोट
सगळे काही पिवून घेण्यासाठी थांबलीस—

थांबलीस ना आठवणींच्या खुणा साठविण्यासाठी कातरवेळी
लहडलेली हिरवळ तुडवून सोसला होतास झिम्मड पाऊस—
घेतला होतास भिजलेल्या रानफुलांचा मदीर गंध—
तू थांबलीस त्या वाटेवर
दगडावरचा गोंदवलेला शब्द पुन्हा गोंदण्यासाठी
माझे धुळीत माखले होते पाय
वर्षानुवर्षे उठल्या होत्या —
त्या दगडावर गोंदलेल्या शब्दांचा
हुंकार ऐकण्यासाठी पाऊलखुणा...

खुणाच लिपकल्या आहेत देहात
आणि अशाच संध्याकाळी मी जन्म घेणार आहे पुन्हा
त्या दगडावर, गोंदलेल्या शब्दांचा हुंकार ऐकण्यासाठी—
'आई, कुणाचे हे थडगे सांग ना ?'...

# ॥ मुखवटे ॥

खोटेपणाचा आव आणून पांघरूण का घेता ?
जीवनात रक्ताळलेली क्रांती तुमच्या
पायदळी तुडविली जाणार आहेच थोडी ?

डोळ्यांच्या शिंपल्यात क्रंदनाचे ठसे आहेत
मग सर्कशीतल्या विदुषकासारखे का वागता
चेहऱ्यावर मुखवटे घेऊन ?

दुःखाचे वादळ शमविण्यासाठी ओठावर हंसू आणता फक्त
जीवनात कांही घडलेच नाही हे दाखविण्यासाठी
मग हळूवार फुंकर घालता कशाला
या वेड्या मरगळलेल्या मनावर ?

ओल्या जखमा पुसून टाकल्या तरी व्रण पुसणार
आहेत काय ?—तुमच्या हृदयातील हलकल्लोळांचा आवाज
थांबणार आहे तुमच्यासाठी ?
सोडा तो बुरखा काळवंडलेला अन् चक्रव्यूहात जा
अभिमन्यूसारखे.....मरणाला का घाबरता ?
मरण तर तुमच्याच मुठीत आहे—

खोटेपणाचा आव आणू नका, झांकली मूठ सव्वालाखाची ठेवू नका—
उघडा ती मूठ अन् दाखवा तुमची
क्रांतीने रंगलेली पाच बोटे
जी उठली आहेत तुमच्या जीवनपटलावर
सत्याचे मुखवटे घेऊन...

## ।। राख ।।

तुझ्या गालावरचे दोन आसू
हे माझ्या विस्कटलेल्या सोनेरी
स्वप्नांचे दूत आहेत

तुला भावना आहे याची ती साक्ष आहे
पण आता खूप उशीर झाला...
तुझ्या आठवणींचे उसासे फक्त उरले आहेत
तुझ्या  जखमाना फुंकर घालण्यासाठी

तुझ्या गालावरचे दोन आसू
भारावलेल्या मनाने पुसून टाक
मीही पुरता आता जळून गेलो आहे
उरली आहे फक्त राख !...

काव्य

## ॥ प्रश्न ॥

विश्वाच्या पोकळीत काय निर्माण केलेस ?
जाताना केवढा प्रश्न केलास तू
त्या प्रश्नाना उत्तर शोधीत मी
आयुष्याची पाऊलवाट तुडविली...

मलूल धूसर धुक्याला स्पर्श केला
क्षितिजाच्या व्याप्तीची त्रिज्या मोजून
पण तुझ्या प्रश्नाचे उत्तर सांपडत नाही...

पाण्यावर हात मारून पाहिले
क्षणभर लाटा उसळल्या पण
पुन्हा पाणी ते पाणीच...

विश्वाच्या पोकळीत मी काय निर्माण करू ?
जे सूर्यालाही ठाऊक नसेल
असे माझे मन मी जाळून घेईन
फक्त तुझी पवित्रता जाणण्यासाठी...

## ॥ ठसे ॥

मंतरलेल्या आकाशातून
तुझ्या अस्तित्वाची चाहूल
जरा लागू दे या वाटेवर...

मी माझ्या विस्कटलेल्या
चेहऱ्याचे प्रतिबिंब बघू कुठे ?
सारे पाणीच गढूळ झाले आहे...

उत्तर रात्री समुद्र भारावलेला होता
वेड्या किनाऱ्याची भाषा
मौन झाली होती
हे तुला ठाऊक आहे ?...

रक्तरंजित प्राचीवर उठणार होते
अपुल्या हाताचे दोन ठसे
पण ते घडले नाही
तू मात्र गेलीस वादळवाऱ्यासारखी...

आणि मी तिथेच राहिलो
तुझी पाऊले मोजीत
मंतरलेल्या आकाशाला बोलावीत...

## ॥ दगड ॥

मीच माझ्या देहाचा आहे बनून दगड
आक्रसलेल्या आकाशा तुझे दार उघड

पाहू दे मला विद्ध झालेल्या माझ्या भावना
निळ्याशार ओकलेल्या उफाळलेल्या वेदना
कैफ माझा आहे अजून राखेतील निखाऱ्यासारखा
मरगळलो पण त्राण आहे सुटलेल्या बाणासारखा

डोळ्यावर जरी रेंगाळली आमलेली झिम्मड
आक्रसलेल्या आकाशा तुझे दार उघड

तूही का झालास इंद्रासारखा शापभ्रष्ट
हजार चांदण्या तुझ्या शरीरात आकृष्ट
चंद्र सुंदर असूनही त्यालासुद्धा लागला डाग
मग मीच का माझी ओकू नये आग
तुझ्या सुद्धां स्पंदनात ढगांची गडगड
आक्रसलेल्या आकाशा तुझे दार उघड

आठवतो मला तिचा भरलेला हिरवा चुडा
पहिल्या रात्री ओठावर रंगलेला लाल विडा
स्वप्नाळली धुंद नशा मत्त गंध दाटलेला
मेंदी रंगल्या हाताचा स्पर्श अंगी शहारलेला
मिठीमध्ये दिठी होती बसलेली फक्कड
आक्रसलेल्या आकाशा तुझे दार उघड

हीच एक आठवण उरी आज सलते आहे
म्हणून या दगडातून पाझर असा फुटतो आहे
यमालाही वाटेल उगाच टाकला माझा फास
अन् ओल्या हळदीचा फक्त उरला आभास
रक्तात आहे आसूड जरी बनलो मीं दगड
आक्रसलेल्या आकाशा तुझे दार उघड

एकाएकी क्षणार्धात बदलावा तुझा नूर
वाऱ्याचाही फुटावा दिशादिशात ऊर
तुझे सारे आक्रसलेले लालबुंद उग्र व्हावे
माझ्या व्यथेसाठी तुझे वीजेचे हात व्हावे
त्याच तुझ्या हातानी फुटावा हा दगड
आक्रसलेल्या आकाशा, तुझे दार उघड

## ॥ तू प्रीतीची ॥

तू प्रीतीची नुस्ती वेडी माझ्या दारी वेल ग
या वृक्षाला सदा फुलवुनी गंधीत विळखे घाल ग...

छायांची असू दे ग जाळी तिथे स्वप्न तू पालव ग
हिंदोळा चंद्राचा करुनी, झुलव त्यावरी वैभव ग...

त्या रात्रीचा साज तुझा तो पुन्हा होऊ दे अभिनव ग
तुझी पाचुची बोटे अलगद आकाशावर उमटव ग...

या डोळ्यातील सोनपिसांची बावरलेली खूण ग
उत्तररात्री तव नावाची मनी माझिया धून ग..

## ।। प्रतिक ।।

एका गवताच्या पात्याची गोष्ट

चैत्रात उगवले
श्रावणात फुलले
मार्गशीर्षात हळदिवे झाले
आणि फाल्गुनात पडले !

त्याचे मूळ मी जपून
ठेवले आहे
माझ्या दुःखाचे ते
प्रतिक आहे

## ॥ चार कविता ॥

### तीळ

तुझ्या गोऱ्या मुखचंद्रावर
इवलासा तिळाचा डाग
ठाऊक आहे का तुला सखये
त्याच्यासाठी मनात पेटते आग

### कळी

हंसलास एकदा धबधब्यासारखा
तेव्हा वीज चमकून गेली
अन् एक कळी वादळात पडली

### सूर्य

अशा सकाळी प्राजक्तांचा
सडा पडायला हवा
अमृताचा पेला घेऊन
सूर्य यायला हवा

### कातरवेळ

ही चित्तथरारक
उभी आडवी कातरवेळ
तुझ्यामाझ्या मिठीत हरवेल

## ॥ माझे डोळे ॥

डोळ्यात माझ्या रंग उधळू नको
डोळे स्वप्नमयी
फुले जाईजुई
फुलूं दे हंसू दे—
स्वप्नांच्या सीमेवर जाऊ नको

हे वस्त्र भरजरी
झुके यौवन उरी
उफाळू फेसाळू दे
सागराचा अंत शोधू नको

मादक शराबी
मोहक गुलाबी
असू दे होऊ दे
वादळात फुलांचा सुगंध घेऊ नको

वादळ जन्ममृत्यूचे
जे गूढ-प्रगूढतेचे
आसू हे राहू दे
पैलतीर जीवनाचे तू गाठू नको
डोळ्यात माझ्या रंग उधळू नको

## ॥ मलूललेले ॥

मलूललेल्या आकाशासारखे आज
मलूललेले सारे...
मलूललेले मन...सूर्य चंद्र धरती वारे...

मलूललेली वाट म्हणूनच
इवल्या इवल्या पाऊलखुणा
श्वासामधुनी जांभुळल्या आयुष्याच्या रेषा नाना...

मलूललेल्या दिशातून फुटलेली एकच वीज
गारठलेल्या छिद्रामध्ये आसवलेली नीज...

वाफा होऊन थिजल्या साऱ्या
आयुष्याच्या आठवणी
मलूललेली खोलवर रेंगाळते शापवाणी...

मलूललेला मी.. तू आणि अपुले कवडसे
मेल्यावरही फुटू दे पुन्हा जिवंत वळसे...

# ॥ एक तू : एक मी ॥

एक तू : सप्तपदी चालणारी
सुरंगी रंगात फुलणारी
गूढ धुक्यात बुडणारी

एक मी : ज्याने कोरली सारी स्पंदने
हृदयाच्या क्षितिजावर
आठवणींचे मोहोळ मनात घुटमळल्यावर

एक तू : रंगिली रंगिली
श्रावणातल्या सरीसारखी
गुलाबांच्या ताटव्यात
धुंद-फुंद झालेली

एक मी : शोधणारा, दाट झाडांच्या
सरकणाऱ्या सावल्या
दूर डोंगरावरच्या बाहुल्या !

एक तू : भिरभिरणारी
नागमोडी वळणात थांबणारी
अथांग आकाशात सोनेरी दिशा
पाहणारी

एक मी : आयुष्याची गीता वाचून दाखविणारा
जागत्या पहारी
तुझ्या वाटा सांगणारा

## ॥ काटा ॥

निळ्या निळ्या आकाशात
सारे निळे निळे
पिवळे ऊन्ह प्यालो तरीही
अंग निळे निळे...

निळ्या निळ्या आकाशात
एकच लाल कडा
निळ्याशार डोळ्यामध्ये
स्वप्नांचा सडा...

निळ्या निळ्या आकाशात
पिवळी जांभळी छटा
खोल खोल रुतलाय
काळजात काटा...

## ॥ सुरंगा ॥

जरा लाजत लाजत ये तू कापुरी धुक्यात
रंग उधळुनी क्षणी थांब तू मेघात

कडा भर काजळाने तव इंद्रधनू नेत्री
शर असू दे विजेचा तुझ्या उफाळत्या गात्री

तुझे कुरळ कुंतल जरा सोड वाऱ्यावर
गंध येऊ दे भरूनी दर्वळून चराचर

तुझ्या हळदिव्या अंगी बटमोगरा फुलव
तुझ्या सुनहरी करी मेंदी भर तू कोरीव

कुंभ नवरंग शिरी तू घेऊनी उधळ
अशी सुरंगा होऊनी माझे रंगव आभाळ

## ॥ आघात ॥

धमन्या विस्कटल्यात
आठवू कशाला ?

हृदयाची चाळण झाली आहे
थांबू कशाला ?

डोळे निस्तेज झाले आहेत
राहू कशाला ?

इतुके असूनही जगलो आहे
विचारशील का तू कशाला ?

तुझ्या जाण्याचा आघात सहन करण्याला

## ।। अशी यावीस तू ।।

स्वप्नगंध यावा
मनाच्या कोंदणी
तुझ्या आठवणी
आठवाव्या

पहिल्या रात्रीचे
चांदणे हंसावे
एकरूप व्हावे
एकांतात

तुझिया स्पर्शाचा
पहाटगारवा
भरुनिया यावा
धुंदफुंद

उजळावी प्राची
रंग उधळुनी
कोवळ्या किरणी
आभासात

अशी यावीस तू
वलयामधून
द्यावा समाधान
वेड्या मना

## ॥ चंद्र नेत्री भारावलेला ॥

चंद्र नेत्री भारावलेला
पहिल्या रात्री दिसला ग
मोगऱ्याचा गंध उरी
सखे अपुल्या दरवळला ग...

सोनपिसांच्या स्पर्शातून तव
स्वप्न तरंग उठले ग
पदर घेउनी मुखकमलावर
लाजवंती तू झालीस ग...

हळद अजुनी तव अंगाची
ओली जरा राहिली ग
हातावरची मेंदी गुलाबी
गोऱ्या कांती रंगली ग...

चंद्र रात्री भारावलेला
हिरवा चुडा किणकिणला ग
उत्तररात्री मावळताना
डाग तयावर पडला ग...

## ॥ जेव्हा तेव्हा ॥

जेव्हा किरण पिवळे
आतुरले होते धरेवर येण्या;
झाडांच्या फांद्यात—

तेव्हा अनंताची झेप
घेऊन उडाला पांढरा पारवा;
शोधण्यास मार्ग—

आणि नीलसागराच्या
लाटा अधीरल्या खडकाच्या कुशी;
गाढ लपण्यास—

जेव्हां तुझिया ओढीचे
चांदणे रुपेरी होते प्रवाहात;
व्यापीत तळाला—

तेव्हा माझे मन होते
शोधीत तुजला
आभाळाच्या ठायी—

## ॥ तू गेलीस अन् ॥

तू गेलीस अन्
उगाच इथे फिरे सावली
उगाच साऱ्या आठवणींची
हृदयी अजुनी खळबळ दाटली

तू गेलीस अन्
या छायेत किती निमाली
गूढ होउनी आज अचानक
असंख्य वलये स्वप्नामधली

तू गेलीस पण शब्द राहिले
तुझिया नाजुक ओठावरचे
म्हणालीस तू येईन पुन्हा
नाते घेऊन आभाळाचे

म्हणालीस ना तू हे सारे
या छायेत धुंद होऊनी
तू गेलीस अन् उभा इथे मी
आभाळाचे अश्रू पिवुनी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७७१
२३७९८
दा. क्र.
काव्य १६४/२५२
संद० शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0023418
REFBK-0023418

## ॥ दान ॥

माझी हरवलेली वेदना
पुन्हा जागृत व्हावी;
काटेरी कुंपणावर
डोळ्यांची राख व्हावी

गडद निळ्या नभात
लाल कडा रुतून बसाव्या;
विषगर्भ घेता घेता
इंगळ्या मनाला डसाव्या

इंद्रभोगी शरीराला
खग्रास ग्रहण लागावे;
दान तुझे घेता घेता
अंधारातच मरावे



# श्री. मनोहर तोडणकर

कवितेच्या प्रवासाला निघालेला हा यात्रिक गेली वीस वर्षे ' एकला चलो रे 'चा मंत्र गुणगुणत आपली पायवाट तुडवतो आहे. स्वतःच स्वतःचा मार्ग शोधीत त्याने आरंभलेला कवितेचा प्रवास आज रसिकांपुढे येत आहे.

मनोहर तोडणकर मूळचे दाभोळचे. निसर्गवेडे. मोहरलेली आंबराई, झिळमिळणारी वाळू, उधाणणाऱ्या लाटा, वेडावलेला समुद्रकिनारा, वाऱ्यानं दिमाखानं डोलणारे उंच उंच माड, घनदाट पोफळी अशा निसर्ग सान्निध्यात त्यांचे भावमन घडलेले. तोडणकर प्रेमशाहीरही आहेत. मानवी प्रेमभावनेचे विविध कंगोरे विलग करून त्यांची मनोहर विखरण ते करतात. प्रेमातील सौंदर्य, साफल्य, विफलता, हुरहूर, विरह, दुःख, आवेग, अगतिकता, उच्छृंखलता, श्रद्धा, अविश्वास–संशय अशा अनेकानेक मूड्सचे कल्लोळ ही कविता निर्माण करते.

पायात चाळ बांधून लयबद्ध पदन्यास टाकणाऱ्या नर्तकीसारखी ही कविता; ती नादमधूर तसेच भावमधूरही आहे. कवितेतील आंतरीक आशयाला तोलणारा नाद, ताल, ठेका या कवितेला आहे.

परंपरागत मराठी कवितेचे संचित ती जपते. पण त्याचबरोबर आजच्या नव्या कवितेतील नवीन प्रवाहातही ती सहज सामावून जाते.

मानवी मनाचा तळ गाठणारी आणि त्याचा उकल शोधणारी ही कविता कधी गूढ–अबोध वाटते. पण तोडणकरांची एकेक कविता म्हणजे प्रतिभेच्या दिव्य स्पर्शाने झळाळणारे ' फूलझगरे ' आहेत.